RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ११, अंक ७२] बुधवार, नोव्हेंबर १९, २०२५/कार्तिक २८, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

असाधारण क्रमांक १७३

प्राधिकृत प्रकाशन

**नगरविकास विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ३२,

दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३९/१८/(भाग-१)/नवि-१३.— महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (महाराष्ट्र अधिनियम क्र.३१) च्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे) प्राप्त अधिकारानुसार याद्वारे उक्त अधिनियमातंर्गत प्रादेशिक योजना नकाशा आणि विकास नियंत्रण नियमावलीशी संबंधित अभिलेख नागरीकांना उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने एकूण चार लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्रे, शुल्क, सदर लोकसेवांकरिता नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, द्वितीय अपिलीय अधिकारी या बाबींचा, तपशील सोबतच्या **अनुसूची "अ"** मध्ये नमूद केल्यानुसार शासन नगरविकास विभागामार्फत महाराष्ट्र शासन असाधारण **राजपत्रा**मध्ये अधिसूचित करण्यात येत आहे.

## अनुसूची-अ

**(शासन निर्णय, नगरविकास विभाग क्रमांकः टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३९/१८/(भाग-१)/नवि-१३,**
**दि.१७ नोव्हेंबर,२०२५.**

(महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत प्रादेशिक योजना नकाशा आणि विकास नियंत्रण नियमावलीशी संबंधित अभिलेख नागरीकांना उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने अधिसूचित करावयाच्या सेवांची यादी)

| अ.क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | शुल्क | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रादेशिक योजना नकाशा विक्री (रंगीत / कृष्णधवल) PDF स्वरुपात | विहित नमुन्यातील अर्ज. | रुपये- २०००/- मात्र | ३ दिवस | रचना सहायक/ सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | सहायक संचालक, नगररचना. |
| २ | प्रादेशिक योजनेतील विकास केंद्र नकाशा विक्री / Sectorial Plan / परीघस्त नकाशा (fringe area network plan) (रंगीत / कृष्णधवल) PDF स्वरुपात | विहित नमुन्यातील अर्ज | रुपये- १०००/- मात्र | ३ दिवस | रचना सहायक/ सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | सहायक संचालक, नगररचना. |
| ३ | प्रादेशिक योजना क्षेत्रासाठीचे विकास नियंत्रण नियमावली online pdf प्रत | विहित नमुन्यातील अर्ज | रुपये – १००/- मात्र. | ३ दिवस | रचना सहायक/ सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | सहायक संचालक, नगररचना. |
| ४. | प्रादेशिक योजना अहवाल PDF स्वरुपात. | विहित नमुन्यातील अर्ज | रुपये – १००/- मात्र. | ३ दिवस | रचना सहायक/ सहायक नगर रचनाकार | नगर रचनाकार | सहायक संचालक, नगररचना. |

**टिप :—**

१. उपरोक्त नमूद चार सेवा महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार पोर्टलशी इंटीग्रेट करणे आवश्यक आहे.

२. उपरोक्त नमूद चार लोकसेवा उपलब्धतेबाबत संबंधित कार्यालयांनी प्रभावी प्रचार मोहीम राबवावी तसेच लेखन सामग्रीवर महाराष्ट्र सेवा हक्क कायद्याकरिता टॅग लाईन तसेच लोगो नमूद करण्यात यावा.

सदर शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुलेखा वैजापूरकर,**
सहसचिव, महाराष्ट्र शासन.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.